सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था, अकोला या संस्थेच्या जिनिंग प्रेसिंग प्रकल्पास राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेअंतर्गत शासकीय भाग-भांडवल मंजूर करणेबाबत. (कोल्हे कमिटी)

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक :- प्रक्रिया-१११४/प्र.क्र.२५/९-स,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ जानेवारी, २०१८

वाचा :- १. शासन निर्णय क्रमांक :प्रक्रिया-११२००४/प.क्र.१६२(अ)/९-स, दि.१२.१०.२००७.
२. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दि. १३ नोव्हेंबर, २०१७
३. शासन निर्णय समक्रमांक दि. २७.१.२०१५, दि. २७.२.२०१५, दि. ३१.०३.२०१६ व ३१.०३.२०१७
४. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:-अर्थसः-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.
५. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:-अर्थसः-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७.

प्रास्ताविक :-

राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषि मालाला योग्य व रास्त भाव मिळावा तसेच स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने संदर्भ-१ येथील शासन निर्णयातील तरतुदींनुसार राज्यातील कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना १:९ या प्रमाणात रु.५.००कोटीच्या मर्यादेत खालील आकृतीबंधात दर्शविण्यात आल्यानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते.

(रुपये लाखात)

अ. क्र.	**तपशील**	**टक्केवारी (प्रकल्प किंमतीच्या)**	**आर्थिक आकृतीबंध (कमाल रु.५००.००)**
१	राज्य शासनाच्या हमीवर राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली किंवा इतर वित्तीय संस्थेकडून कर्ज.	६०%	३००.००
२	राज्य शासनाचे भाग-भांडवल	३६%	१८०.००
	एकूण {१+२} :-	९६%	४८०.००
३	संस्थेचे स्व भाग-भांडवल	०४%	२०.००
	एकूण :-	**१००%**	५००.००

२. सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., अकोला या संस्थेची नोंदणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी केलेली असून संस्थेचे वर्गीकरण प्रक्रिया संस्था व उपवर्गीकरण कृषि प्रक्रिया संस्था असे आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र अकोला जिल्हयापुरते मर्यादीत असून संस्थेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या कापूस या पिकावर जिनिंग प्रेसिंग करणे हा आहे. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत कापूस या पिकाचा समावेश संदर्भीय दिनांक १२.१०.२०१० च्या शुध्दीपत्रकान्वये करण्यात आलेला आहे.

३. संस्थेने रु.७१८.२० लक्ष किंमतीचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केलेला असून, संस्थेच्या सदर प्रस्तावाकरिता बँक ऑफ महाराष्ट्र ने कर्ज देण्याचे मान्य केलेले असून, त्याबाबतचे मंजूरीपत्र दिलेले आहे. त्यामुळे संस्थेस कोणत्याही प्रकारची शासन हमी किंवा रा.स.वि.नि. कर्जाची आवश्यकता नसून, विहित वित्तीय आकृतीबंधानुसार केवळ शासनाकडून रु.५००.०० लक्ष किंमतीच्या मर्यादेत प्रकल्प किंमतीच्या ३६% भाग-भांडवलाची मागणी करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखात)

अ. क्र.	**तपशील**	**टक्केवारी (प्रकल्प किंमतीच्या)**	**४:३६:६० या प्रमाणात शासनाने मंजूर केलेला आर्थिक आकृतीबंध**
१	**२**	**३**	**४**
१	बँक ऑफ महाराष्ट्रचे कर्ज	३६%	१८०.००
	क्वासी इक्विटी कॅपिटल	२४%	१५०.००
२	राज्य शासनाचे भाग-भांडवल	३६%	१८०.००
	एकूण {१+२} :-	**९६%**	**५१०.००**
३	संस्थेचे स्व भाग-भांडवल	०४%	२०८.२०
	एकूण {१+२+३} :-	**१००%**	**७१८.००**

४. संदर्भीय दिनांक १२.१०.२००७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत प्रकल्प किंमतीची कमाल मर्यादा रु.५.०० कोटी विहीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने, संस्थेच्या प्रकल्पाची किंमत रु.५.०० कोटी पेक्षा अधिक असूनही संस्थेने रु.५.०० कोटी इतक्या प्रकल्प किंमतीच्या मर्यादेत ३६% म्हणजे रु.१८०.०० लक्ष इतक्या शासकीय भाग-भांडवलाची मागणी केलेली आहे. उर्वरित रक्कम संस्था त्यांचे स्तरावर उभी करणार आहे. संस्थेने स्व:भाग-भांडवलापोटी रु.१,००,३५,२८२/- इतक्या रक्कमेचा भरणा बँक ऑफ महाराष्ट्र, डाबकी रोड शाखा, अकोला या बँकेत जमा केली होती.

५. संस्थेने बँक ऑफ महाराष्ट्र कडून घेतलेले कर्ज, संस्थेचे स्वभागभांडवल आणि शासनाने वितरीत केलेले रु.५६.४२ लाख इतक्या रक्कमेचा संस्थेने विनियोग केला आहे. सदर रक्कमेतुन संस्थेने प्रकल्पाची उभारणी पूर्ण केलेली आहे. सदयस्थितीत प्रकल्पातून उत्पादन चालू असुन, संस्था बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेस कर्ज परतफेड करत आहे.

६. संस्था विदर्भातील असल्यामुळे संस्थेच्या सदर प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने, संस्थेस मंजूर होणाऱ्या रक्कमेएवढया किंमतीची संस्थेची मालमत्ता शासनाकडे तारण ठेवण्याबाबतचे करारपत्र संस्थेकडून करून घेणे आणि संस्थेच्या संचालकांकडून त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेचा बॉंड लिहून घेणे या अटींच्या अधीन राहून सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., अकोला या संस्थेस सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ४४२५ ०७५९ या लेखाशिर्षाखाली शासकीय भाग-भांडवलाकरिता अनुज्ञेय असलेल्या रक्कमेपैकी प्रादेशिक विभाग निहाय वाटपानुसार व वित्त विभागाच्या दि. ३०.०६.२०१७ व दि.१८.०४.२०१७ च्या परिपत्रकानुसार ८०% च्या मर्यादेत विदर्भाच्या हिश्श्याची (२३.०३%) **रू.५५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्चावन्न लाख फक्त)** इतकी रक्कम मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

<u>शासन निर्णय</u> :-

सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., अकोला या संस्थेच्या जिनिंग प्रेसिंग प्रकल्पासाठी कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य योजनेअंतर्गत मंजूर वित्तीय आकृतीबंधानुसार अनुज्ञेय असलेल्या शासकीय भाग-भांडवलाच्या रु.१८०.०० लक्ष रक्कमेपैकी प्रादेशिक विभाग निहाय वाटपानुसार व वित्त विभागाच्या विभागाच्या दि. ३०.०६.२०१७ व दि.१८.०४.२०१७ च्या परिपत्रकानुसार ८०% च्या मर्यादेत रू.५५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्चावन्न लाख फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. शासकीय भाग-भांडवलाच्या परतफेडीच्या अटी व शर्ती संदर्भीय क्रमांक १ येथील दिनांक १२.१०.२००७ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार राहतील.

२. संस्थेस मंजूर होणाऱ्या रक्कमेएवढया किंमतीची संस्थेची मालमत्ता शासनाकडे तारण ठेवण्याबाबतचे करारपत्र संस्थेकडून करून घेणे आणि संस्थेच्या संचालकांकडून त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेचा बॉंड लिहून घेणे बंधनकारक राहील.

३. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या **रू.५५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्चावन्न लाख फक्त)** इतक्या रकमेचे आहरण करुन **सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., अकोला** या संस्थेला वितरित करण्याकरिता लेखाधिकारी, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेली रक्कम जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय, पुणे येथून आहरित करुन संस्थेस वितरीत करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांनी करावी. त्यास अनुसरुन उक्त परि. २ मधील अटीची पूर्तता झाल्यानंतरच रू.५५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्चावन्न लाख फक्त) चा धनादेश

सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादीत, अकोला, जि. अकोला
" SAMYAK KRUSHI UTPADAK PRAKRIYA SAHAKARI SANSTHA LTD, AKOLA, DIST. AKOLA."

या नांवाने काढण्यात यावा व सदर धनादेश संस्थेस वितरित करण्यात यावा.

४. याव्यतिरिक्त **सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., अकोला** या संस्थेस शासकीय भाग-भांडवलाच्या परतफेडीसाठी नेहमीच्या अटी व शर्ती (त्यात काही सुधारणा /बदल असल्यास त्यासह) बंधनकारक राहतील.

५. वरीलप्रमाणे मंजूर केलेला शासकीय भाग-भांडवलाचा **रू.५५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्चावन्न लाख फक्त)** चा खर्च **"मागणी क्र.व्ही-३, ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च, (००) (१०८) इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका (०२) सहकारी संस्करण संस्था - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गंत योजना (०२) (०८) कृषि प्रक्रिया संस्थांना भाग भांडवली अंशदान (कोल्हे समिती) (राज्य योजना) (४४२५ ०७५९) ३२, अंशदाने"** या लेखाशिर्षाखाली **सन २०१७-१८** च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदरच्या रकमेचा विनियोग संस्था आवश्यक त्या संबंधित बाबींकरिताच करीत आहे, याबाबतचे नियंत्रण पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ठेवावे व याबाबतचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर

करण्यात यावा. त्याचप्रमाणे पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी संस्थेच्या कामकाजावर आणि प्रकल्प उभारणीवर लक्ष ठेवणे अनिवार्य आहे.

७. संस्थेच्या कामाच्या प्रगतीचा तिमाही अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी पणन संचालक, पुणे यांना वेळोवेळी सादर करणे बंधनकारक राहील. पणन संचालक, पुणे यांनी सदर अहवाल तपासून शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास न चुकता दर तीन महिन्यानंतर सादर करणे अनिवार्य राहील. **संस्थेकडून योग्य वेळी व योग्य प्रमाणात वसूली होण्याबाबत यथायोग्य दक्षता घेणे, पणन संचालक यांचेवर बंधनकारक राहील. या कामी कुचराई झाल्यास एकरक्कमी अर्थसहाय्याची रक्कम वसूल करण्याचे संपूर्ण अधिकार शासनाकडे राहतील.** संस्थेचा प्रकल्प विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत संस्थेने योग्य ती काळजी घ्यावी आणि त्यावर पणन संचालक, पुणे यांनी नियंत्रण ठेवावे.

८. या प्रकल्प खर्चामध्ये वाढ झाल्यास सदर वाढीव किंमत संस्थेने स्वबळावर उभी करावयाची आहे. वाढीव प्रकल्प किंमतीमध्ये शासनाचा कोणताही अर्थसहाय्याचा सहभाग असणार नाही, याची संस्थेने नोंद घ्यावी.

९. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका , नियम १४८ व १५३ अन्वये शासनाने दिलेली कर्जे व त्यावरील व्याजाची वेळचेवेळी वसुली नियमितपणे केली जात आहे व त्या सरकारी लेख्यात यथोचितरित्या जमा केल्या जात आहेत यावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विभागीय नियंत्रक अधिका-याची आहे. तसेच दिलेल्या कर्जासंबंधीचे अभिलेख संकलित करणे, लेखे अद्ययावत ठेवणे आणि त्या संदर्भातील इतर आवश्यक कार्यवाही करणे ही जबाबदारी देखील संबंधित नियंत्रक अधिका-याची आहे. या संदर्भातील सूचना वित्त विभागामार्फत यापूर्वीच देण्यात आल्या आहेत.

१०. हे आदेश वित्त विभागाचे वाचामधील ४ व ५ मध्ये उल्लेख केलेल्या शासन परिपत्रकाद्वारे प्रशासकीय विभागास दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत. संस्थेने वाचा मधील क्रमांक ४ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. ७ ते १८ मधील तसेच, त्याच परिपत्रकातील मुद्दा क्र. ८ मधील १ ते १० क्रमांकाच्या अटींची पुर्तता केलेली आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०११११४१२१८०००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Mahendra Shantaram Pujari

Digitally signed by Mahendra Shantaram Pujari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMTD DEPARTMENT, postalCode=400012, st=Maharashtra, 2.5.4.20=16153bd1d85632a421d5a5fd23bf5e5bb624d27f2c8cf59fb17e3ead3a034dbc, cn=Mahendra Shantaram Pujari
Date: 2018.01.11 14:17:29 +05'30'

(महेंद्र पुजारी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव सचिव
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव

४. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. सर्व मा.विधीमंडळ सदस्य,
६. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
९. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४३१) मंत्रालय, मुंबई
१६. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-२)/(अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
१७. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला
१८. लेखाधिकारी, पणन संचालनालय, म. रा. पुणे-१
१९. कार्यासन अधिकारी (१७-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२०. अवर सचिव (२१-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१. अध्यक्ष, सम्यक कृषि उत्पादक प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., अकोला
२२. निवड नस्ती (९स).

शासकीय भाग-भांडवल परतफेडीबाबत अटी व शर्ती.

1. सहकारी संस्थेस राज्य शासनास खाली नमूद केलेल्या मुदतीकरिता अग्रहक्काचे भाग (रिडिमेबल प्रिफरन्स शेअर्स) जारी करावे लागतील.
   a. मंजूर केलेल्या शासकीय भाग-भांडवलाचे ५०% भाग १० वर्षे मुदतीच्या अग्रहक्काचे (रिडिमेबल) राहतील.
   b. मंजूर केलेल्या शासकीय भाग-भांडवलाचे ५०% भाग १५ वर्षे मुदतीच्या अग्रहक्काचे (रिडिमेबल) राहतील.
2. सहकारी संस्था भाग-भांडवल परतफेड निधी निर्माण करील व त्यामध्ये दरवर्षी मंजूर केलेल्या भाग-भांडवलाच्या १/१५ इतकी रक्कम निव्वळ नफा काढणेपूर्वी सदर परतफेड निधीमध्ये जमा करतील.
3. सहकारी संस्थांना मिळालेल्या त्या भाग-भांडवलापैकी संपूर्ण भाग-भांडवल शासनास परत केल्याशिवाय सभासदांचे भाग-भांडवल परत करु शकणार नाही. मात्र जी सहकारी संस्था नंतर अवसायनात येईल, त्या संस्थेचे सभासदांचे भाग-भांडवल सहकार आयुक्त यांनी ठरवून दिलेल्या अटीनुसार परत करता येईल.
4. संस्थेने शासनाचे भाग-भांडवल पूर्णत: फेड होईपर्यंत ४% पेक्षा जास्त लाभांश जाहीर करु नये.
5. संस्थेने तिच्या सभासदांच्या मंजूरीतून ६ पैसे प्रती रुपयाप्रमाणे कपात करुन स्वत:चे भाग-भांडवल वाढवावे.
6. संस्थेने शासकीय भाग-भांडवल मिळाल्यापासून सहा महिन्यांच्या आत भाग-भांडवल प्रमाणपत्र "महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल" यांच्या नांवाने जाहीर करावे. अन्यथा शासनाचे संपूर्ण भाग-भांडवल एकरकमी वसूल करण्यात येईल.
7. सहकारी संस्थेने तिचा काढलेला भाग-भांडवल परतफेड निधी तिच्या नित्याच्या व्यवहारात वापरणार नाही. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार निरनिराळया वर्गाच्या सहकारी संस्थांस विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे गुंतवणूक करता येईल.
8. ज्या सहकारी संस्थेमध्ये कर्मचारी वर्गाची संख्या १० पेक्षा जास्त आहे, त्या संस्थेने त्यांच्याकडे असलेल्या एकूण जागांपैकी ३४% जागा मागासवर्गीयांसाठी राखून ठेवाव्यात. मागासवर्गीयांच्या एखाद्या गटासाठी राखून ठेवलेल्या रिकाम्या पदासाठी कोणतेही पद योग्य उमेदवाराच्या अभावी त्या गटातील उमेदवाराची नेमणूक करता आली नाही, तर ती ५ भरती वर्षापर्यंत त्या गटातील तशीच राखून ठेवावी. मात्र सेवाभरती करतांना कोणत्याही वेळी राखून ठेवावयाची पदे आणि तशीच चालू ठेवलेली मागील राखीव पदे या दोघांची मिळून होणारी संख्या ही अशा सेवाभरतीच्या वेळी रिकाम्या असलेल्या एकूण पदांच्या ५०% पेक्षा अधिक होवू नये. केवळ दोनच रिकामी पदे असल्यास त्यापैकी एक पद राखीव म्हणून समजण्यात यावे. परंतू जर एकच पद रिकामे असले तर ते बिनराखीव म्हणून समजण्यात यावे. ५०% पेक्षा अधिक होणारे आरक्षण पुढच्या सेवाभरतीच्या वेळेपर्यंत तसेच राखून ठेवण्यात यावे. मात्र ते ५ भरती वर्षापेक्षा अधिक काळ राखून ठेवली जावू नये.
   a. संस्थेने तिच्या एकूण सभासदांच्या १३% अनुसूचित जातीचे सभासद एक वर्षाचे आत करुन घ्यावेत.

9. शासनाने गुंतविलेल्या भागभांडवलावरील शासनास द्यावयाची लाभांशाची रक्कम असा लाभांश जाहिर केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत शासकीय कोषागारात संस्थेने भरली पाहिजे व त्याबाबतची माहिती विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, यांना दिली पाहिजे. या अटींचा भंग केल्यास शासनाचे भाग-भांडवल त्या तारखेस एकरकमी परत घेतले जाईल व शर्तीचा भंग केल्याबद्दल संस्थेविरुध्द जरुर ती कारवाई केली जाईल.
10. संस्थेतील सचिव/व्यवस्थापक व ज्या कर्मचा-यांचे मूळ वेतन रु.३००/- वा त्यापेक्षा जास्त असेल अशा कर्मचाऱ्यांच्या नेमणूका सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे / पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पूर्व संमतीस पात्र राहतील. संस्थेवर योग्य अशा मुख्य कार्यकारी अधिकारी नेमणूक करण्याचे अधिकार सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे / पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे राहतील.
11. शासनाने शासकीय भागभांडवलाकरिता वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीची संस्थेने पूर्तता न केल्यास संस्थेला मिळालेले शासकीय भाग-भांडवल पूर्णतः किंवा अंशतः वसूल करण्याचे अधिकार शासन राखून ठेवत आहे.
12. संस्थेने आपल्या मालमत्तेचा आग विमा, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या कार्यालयाकडूनच उतरविला पाहिजे.
13. शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्ती संस्थेला बंधनकारक राहतील.
14. लेखा परिक्षांची प्रमाणित केलेले वार्षिक आर्थिक पत्रके, संस्थेने प्रत्येक वर्षी महालेखाकार-२, नागपूर यांच्या कार्यालयास पाठवावे. त्याचप्रमाणे संस्थेला आर्थिक सहाय्य मंजूर झाल्याबरोबर तिच्या उपविधीची प्रतही पाठवावी.
15. संस्थेने तिची आर्थिक पत्रके महालेखाकार-२, नागपूर यांच्या तपासणीकरिता नेहमी तयार ठेवावीत.
16. संस्थेकडून शासनाने जर "मिटकॉन" प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक ठरविल्यास तो द्यावा लागेल अन्यथा संपूर्ण रक्कम एकरकमी वसूलीस पात्र असतील.

*****